Vol 3 Issue 9 Oct 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-9, Oct-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# बी (नारायण मुरलीधर गुप्ते) यांच्या दोन कविता चाफा व पिंगा

आनंद वसंत डुडूल
मराठी विभाग प्रमुख,कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा,जि.अमरावती.

***सारांश :***प्रसिद्धी विन्मुख बींनी(नारायण मुरलीधर गुप्ते) 1911 ते 1946 अशी 25 –26 वर्षे काव्यरचना केली. परंतु त्यांच्या कवितांची एकूण संख्या केवळ 49 आहे. आधुनिक मराठी कवितेची सुरुवात केशवसुतांपासून मानली जाते.पूर्वीची मराठी कविता पारमार्थिक होती.ती केशवसुतांनी ऐहिक व आत्मनिष्ठ बनविली. स्वतः केशवसुतांच्या कवितेमधून ज्या 'स्व' चे 'स्व'–निसर्ग संबंधांचे स्व च्या आशा आकांक्षाचे दर्शन घडते.तो स्व' प्राधान्याने ऐहिक आहे.तथापि हा स्व पूर्णपणे ऐहिक नाही. केशवसुतांच्या कवितेतही आध्यात्मिकता आहेच. परंतु त्यांच्या सामाजिक कवितेच्या प्रभावामुळे त्यांची ऐहिकताच सर्वसामान्यपणे चर्चिली जाते. असो.

***प्रस्तावना :***

केशवसुतांनंतर ना.वा. टिळक ,भा. रा. तांबे, बी हे कवी पूर्णांशी आध्यात्मिक होते. ना.वा. टिळक ईश्वरचरणी सदैव लीन झालेत. तांबेंना विश्वात प्रभूचे आनंदरूप दिसते. कवी बी यांच्या वृत्तीही आध्यात्मिकच होत्या. पूर्णत्वाचा त्यांना ध्यास होता व सृष्टी चक्राचा पूर्णत्वाकडे प्रवास सुरू आहे असा विश्वासही त्यांना होता.त्यांची कविता आध्यात्मिक दृष्ट्या स्थिर राहताना दिसते. त्यांच्या कवितेमध्ये अध्यात्म प्रवासाचे टप्पे वा या प्रवासातील बदल नाहीत. एक विचारांती स्वीकारलेली निश्चित दृष्टी त्यांच्या कवितेमध्ये आहे.

बींच्या वृत्ती पूर्वीपासून अध्यात्म चिंतनामध्ये रमणा–या होत्या त्यांचे छोटे बंधू पारमार्थिक क्षेत्रात अधिकारी पुरुष म्हणून नावलौकिकास आले.बींनीही ह्या वाटेवर काही पावले टाकल्याचे त्यांच्या चरित्रावरुन दिसते. पुनर्जन्म, कर्म सिद्धान्त, अद्धैत सिद्धान्त, ईश्वर यावर माझा विश्वास आहे.सर्व मानव ही एक जात आहे. हे अंतिम ध्येय आहे.

हा मनुष्यत्वाचा पूर्ण विकास आहे.हा विकास पूर्ण होण्यास किती शतके लागतील ते सांगता येत नाही हे अंतिम ध्येय आमच्या डोळयांसमोर नेहमी असले पाहिजे.तेथपर्यंत मानवी मनाचा विकास होऊ शकतो हे साधु संतांच्या चारित्र्यावरुन कळून येते.[1] असे ते वा.ना.देशपांडेंना पत्रामध्ये लिहितात.वा.ना.देशपांडेंना उद्देशून लिहिलेली ही भूमिका त्यांच्या काव्यलेखना मागील मध्यवर्ती भूमिका आहे.

चाफा व पिंगा बींच्या अध्यात्म चिंतनातील दोन सवोत्कृश्ट कविता आहेत.

प्रवाह बहुमुख जो होता
वाहे एकमुख आता
वृत्तींचे बळ मज मिळतां
विश्व सहज आले गिळता....
दुर्बलपण पहिले गेलें,
क्षुद्रपणातून मी सुटले,
जीर्णबंध सारे तुटले,
मी माझी मज सापडले!
प्रेमास्तव आता प्रेम

असा अद्वय रंगी रंगणारा पिंगा त्यांनी रंगविलेला आहे. या अद्वय स्थितीचे माध्यम बी पिंगा ही कीडा ठेवतात.

नाचा माझ्या वृत्तींनो
नाचा भुवन समुहांनो
नाच आपला भूताला
होवो शांतिप्रद सकलां

देह भाव स्वीकारूनही साक्षात्काराची अनुभूती येते.(पारंपरिक तत्त्वज्ञानाला कवी बी यांनी दिलेले परिणाम आहे,असे म्हणता येईल का)? असा नागनाथ कोत्तापल्लेंना प्रश्न पडतो.परंतु याला वेगळे परिणाम का म्हणायचे?अतींद्रिय परि भोगवीन इंद्रियांकरवी ही संतांची प्रतिज्ञा जुनीच नाही का?डॉ.श्यामसुंदर स्वान यांनी या पिंग्याचा संबंध ज्ञानेश्वरांच्या चिद्‌विलासवादाशी लावलेला आहे तो चिंत्य आहे.

अद्वैतानुभव घेतानाही नाच आपला भूताला होवो शान्तिप्रद सकलां ही भूमिका बी घेतात त्याचेही संत काव्याशी साम्य आहेच. चाफा या कवितेमध्येही अद्वैत चिंतन आहेच. या कवितेत अत्यंत प्रसन्नपणे सुरुवातीला जीवनातील चैतन्यमयता,गती,उल्हास चित्रित केल्या जातो.जीवन सन्मुखता काव्यमयरीतीने व्यक्त होते.'म्हटली मैनासवे गाणी गंध दरवळला मनी', 'आले माळ सारा हिंडून', 'वायु घाली धांगड धिंगा'अशी कीडाप्रवण जीवनचित्रे मोहकरीतीने व्यक्त होतात. माळावर पशू हंबरीत आहेत,धिप्पाड कडयाला नदी वेढीत आहे.मेघांचे धावणे, विजेचे चटकन लवणे, कळिकेच्या अंगाशी धांगड धिंगा करणारा वायू असे जीवनोर्मींचे मत्त स्वरूप प्रतीत होते.

चल ये रे ये रे गडया
नाचुं उडुं घालु फुगडया
खेळुं झिम्मा झिम पोरी झिम पोरी झिम ।

जीवनाच्या अशा मस्तीत मग्न सृष्टीला मुख स्तंभ राणा कसा आवडील. चाफ्याची प्रेयसी तर एवढी कीडोत्सुक की विश्वाचे अंगणही उणे ठरावे. त्यातही केतकी–नाग, नदी–कडा , वीज–मेघ, कळिका–वायू अशा जोड्या. येथे श्रृंगार सूचक नसून प्रकट आहे.प्रणय,गती,धुंदी,मस्ती इ.गुणांनी युक्त असा चित्ताकर्शक जीवनाचा हा अविष्कार.

परंतु जन विशयाचे किडे यांची धाव बाहयाकडे या ओळीने जीवनाचा चौखूर उधळलेला घोडा कवी काबूत आणतो.या लौकिक वृत्तींचा वरवर निशेध असला आणि क्षणभर तो विरस करीत असला तरी लौकिक जीवनाचा सर्व खळखळाट अद्वैताच्या दिव्य ध्वनीमध्ये पर्यवसित होतो कीडामग्नता,गती, उल्हास या ऐंद्रिय पातळीवरील आस्वाद्य नि मोहक वृत्ती स्वतंत्रपणे रसमयच पण शेवटी ऐंद्रियच.त्यांचे अपर अशा दिव्यानुभवात पर्यवसान होते.

दिठी दिठ जांता मिळून
गात्रे गेली पांगळुन
अंगी रोमांच आले थर थरून
चाफा फुली आला फुलुन
तेजी दिशा गेल्या आटून
कोण मी ————————चाफा?
कोठे दोघे जण ।

पिंगामधील अद्वैतवृत्तीतील अलौकिक आनंद भोगण्यासाठी सिद्ध असलेली मीवृत्ती आणि चाफा कवितेतील प्रेयसीची चाफ्यामध्ये विलीन होण्याची वृत्ती यात उघडच भेद आहे.पिंग्याप्रमाणे देहभान नि अद्वय आनंद अशी युती चाफामध्ये शक्य नव्हती काय?परंतु पिंगामधील अहं भाव राखून अत्यानंद भोगणारी एक वृत्ती आणि चाफा मधील ऐंद्रिय आनंदाचे अतीन्द्रियामध्ये रूपांतर करणारी (गात्रे गेली पांगळून अंगी रोमांच आले थरथरुन, चाफा फुली आला फुलून तेजीं दिशा गेल्या आटून)ही दुसरी वृत्ती बींची समृद्ध चिंतनशीलता व्यक्त करते.

पिंगा आणि चाफा या दोन्ही कवितांमधील कीडाभाव लक्षणीय असून तत्त्वगंभीर वाटणा–या बींचे ते ऐक लोभस रूप आहे. चाफा ही रूपकात्मक कविता आहे.चाफा म्हणजे आत्मा आणि तरुणी म्हणजे जीव. जीव कितीही विलासप्रिय आणि व्यापारप्रिय असला तरी त्याला आपल्या सच्चिदानंद स्वरूपाची ओळख

होणारच. हरपलेले आपले श्रेय मिळविण्यासाठी त्याला हुरहूर ही लागणारच. चाफा फुली फुलून आला असता तेजी दिशा आटून जाणे,आनंदार्णवात सारे जग बुडल्याचा प्रत्यय येणे साहजिक आहे. बींचा[4] हा अभिप्रायच वरील कवितात काव्यरूप झाला आहे. त्यांची अद्वैतनिष्ठ भूमिका या दोन्ही कवितांत सुस्पष्ट होते.

***निष्कर्ष***–

1देहभान स्वीकारूनही अद्‌वैतानंद भोगणे शक्य असल्याचा अनुभव बी मनोज्ञ पद्‌धतीने व्यक्त करतात.

2पिंगामधील अद्वैतवृत्तीतील अलौकिक आनंद भोगण्यासाठी सिद्ध असलेली मी वृत्ती आहे .

3 चाफा मध्ये ऐंद्रिय आनंदाचे अतीन्द्रियामध्ये रूपांतर करणारी वृत्ती बींनी व्यक्त केली आहे.

4येरवी तत्त्वगंभीर वाटणा–या बींचे क्रीडाप्रवण लोभस रूप पिंगा आणि चाफा या दोन्ही कवितांमधून व्यक्त होते.

***संदर्भ***–

1 डॉ. श्यामसुंदर स्वान, कवी बी आकलन व आस्वाद, विजय प्रकाशन, प्रथमावृत्ती,2000,पृ.11.

2 डॉ.नागनाथ कोतापल्ले, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, स्वरूप प्रकाशन, प्रथमावृत्ती,पृ.39.

3 डॉ. श्यामसुंदर स्वान, उनि. पृ.128.

4 डॉ. अक्षयकुमार काळे, अर्वाचीन मराठी काव्य दर्शन, पां. ना. बनहट्‌टी प्रकाशन, ततततत्ती,1999 पृ.90.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net